# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०१.११.२०१८ रोजी (का.प.क्रमांक-२२) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक ०१ नोव्हेंबर २०१८ रोजी (का.क्र.प. २२) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी १२.०५ वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.निपुण विनायक,भाप्रसे, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ३. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| ४. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ५. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ६. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ७. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ८. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ९. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १३. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १४. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १५. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १६. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १७. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| १८. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| १९. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २०. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २१. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २२. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २३. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २४. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २५. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| २६. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| २७. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| २८. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |

| | |
|---|---|
| २९. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३०. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३१. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३२. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३३. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३४. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३५. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ३६. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ३७. | स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज |
| ३८. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ३९. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४०. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४१. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४२. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४३. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४४. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ४५. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ४६. | स.स. श्री.गादगे शितल विरभद्र |
| ४७. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ४८. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ४९. | स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ५०. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ५१. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ५२. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ५३. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ५४. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ५५. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ५६. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ५७. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ५८. | स.स. श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ५९. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ६०. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ६१. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ६२. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ६३. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |
| ६४. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |

| | |
|---|---|
| ६५. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ६६. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ६७. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ६८. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ६९. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७०. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ७१. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७२. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ७३. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ७४. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ७५. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ७६. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ७७. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ७८. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ७९. | स.स. श्रीमती शोभा गुरुलिंगअप्पा बुरांडे |
| ८०. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ८१. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ८२. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
३. श्री.कांबळे चेतन जनार्धन
४. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

श्री.प्रमोद राठोड :स.महापौर श्री.नंदकुमार घोडेले यांचे भगीनी स्व.शकुंतला माहुरेताई तसेच माजी महापौर श्री.गजानन बारवाल यांचे चुलते स्व.रोहिदास बारवाल यांचेही दुख:द निधन झाले यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

यास श्री.राजगौरव वानखेडे श्री गंगाधर ढगे तसेच मा.उपमहापौर विजय औताडे यांनी अनुमोदन दिले.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करणेसाठी उभे रहावे.

या वेळी स्व. शकुतंला माहुरे व स्व.रोहिदास बारवाल यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री.प्रमोद राठोड :मागच्या वेळेस काही सदस्यांनी सभागृहात गोंधळ घातला होता. त्यांना सभागृहात येण्यास परावृत्त केले होते. आता सभा शांततेत चालावी. त्यासाठी त्यांना पुन्हा या वेळीही सभेत येण्यास मनाई करावे.

श्री.अफसर खान :असा कोणताही नियम नाही. जर करायचे असेल तर ज्यांनी मारहाण केली होती त्यांचे बाबतीतही अशी कार्यवाही करावी. जेवढ्यांनी गोंधळ घातला होता. त्या सर्वांनाच बाहेर पाठवावे.

श्री.गंगाधर ढगे :श्री.सय्यद मतीन याचेवर मोठी कार्यवाही झाली. आपणही कार्यवाही केली तो विषय आता संपलेला आहे. विनंती की, श्री.सय्यद मतीन यांना सभागृहात प्रवेश द्यावा.

श्री.अफसर खान :श्री.सय्यद मतीन हे स.सदस्य आहे. त्यांना १० हजार लोकांनी निवडून दिले. त्यांना सभागृहात येण्यास रोखू शकत नाही. न्याय करणार असेल तर सर्वांना द्यावा. एकावरच अन्याय होऊ नये.

श्री.नासेर सिद्दीकी :स्थायी समितीच्या सभेत त्यांना प्रवेश आहे. या सभेसाठी का नाही?

श्री.अफसर खान :सर्वांना न्याय मिळाला पाहिजे. त्यांचेवर गुन्हा दाखल झाला. एमपीडीए मध्ये कार्यवाही केली. असा अन्याय सदस्यांवर होणे योग्य नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :एखादा विषय मंजूर केला असेल व तो विषय विखंडीत करायचा असेल तर शासनाकडे पाठवावे लागते. तसा आपण ठराव घेतला होता की, त्यांना सभागृहात येऊ देऊ नये. जर यायचे असेल तर नियमानुसार शासनाकडे विखंडीतसाठी पाठवावे.

श्री.अफसर खान :तसा ठराव घेता येत नाही. घेता येत असेल तर सचिवांनी खुलासा करावा. महापौरांना फक्त एक दिवसासाठी सभासद रद्द करण्याचा अधिकार आहे

श्री.भगवान घडमोडे :वेळोवेळी सभागृहात कोणी सदस्य अशांतता पसरवत असेल व समज देऊनही ऐकत नसेल तर पीठासीन अधिकारी यांनी तसा निर्णय घेण्यास व ताकीद देण्यास हरकत नाही. जनतेच्या हितासाठी येथे आपण येतो. ज्यांनी वारंवार सभागृहात गोंधळ घातला असेल त्यांना कायमस्वरूपी रोखण्याचा ठराव घ्यावा. अशांतता, कायदा व सुव्यवस्था निर्माण होत असेल तर हे योग्य नाही. पोलीसा प्रमाणेच कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सामाजिक कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी यांची आहे. येथे कशासाठी येतो? हे समजावून सांगितले पाहिजे. या सदस्यामूळे या सभागृहात शांतता राहत नाही. असे शासनास कळवावे. विनंती की, या सभासदाला यापासून रोखवावे.

श्री.अफसर खान :श्रध्दांजली मध्ये भाग घ्यायचा की, नाही हा ज्याचा त्याचा अधिकार आहे. येथे लोकशाही आहे. हिटलर पॉलीसी नाही. ज्यांनी त्यांना मारहाण केली, त्यांना न्याय देत आहे व ज्यांनी मार खाल्ला त्यांचेवर अन्याय करीत आहे. ज्यांनी मारहाण केली त्यांचा ही प्रस्ताव घ्यावा. त्यांनाही सभागृहा बाहेर ठेवावे. ज्यांना योग्य वाटले त्यांनी बघितले ज्यांना आवडले नाही त्यांनी बघितले नाही. सभागृहात सदस्यांना बोलण्याचा अधिकार आहे. स.सदस्य यांना हातापायांनी मारहाण केली हे योग्य नाही.

श्री.विकास एडके :जनतेतून निवडून आलेला सदस्य येथे बोलणार नाही. तर कुठे बोलणार? वैयक्तिक त्या सदस्यांवर अन्याय झाला ते दुरच राहिले पण ज्यांनी मारहाण केली त्यांचेवर कोणतीच कार्यवाही केली नाही. उलट श्री.सय्यद मतीन यांचेवर

कार्यवाही केली. त्यांचेवर गुन्हा दाखल झाला. एमपीडीए मध्ये अडकविले तेथूनही ते सूटून आले परंतु स.श्री.सय्यद मतीन यांना आता न्याय मिळावा. त्यांना सभागृहात येण्याची परवानगी देण्यात यावी.

श्री.रामेश्वर भादवे :मा.अटलबिहारी वाजपेयी असे व्यक्तीमत्व होते की, त्यांची बरोबरी कुणी करू शकणार नाही. त्यांचे बद्दल विरोधकही त्यांची प्रशंसा करायचे. परंतु ज्या दिवशी त्यांचे दु:खद निधन झाले. त्याच दिवशी या सभागृहात एक सदस्य यांनी त्यांच्याबद्दल अपशब्द वापरले होते.

या वेळी सभागृहात गोंधळ निर्माण होतो सदस्य मोठमाठ्याने बोलत असतात.

श्री.त्र्यंबक तुपे :महत्वाच्या विषयावर आजची सभा आहे. सभागृहात कुणाला प्रवेश द्यायचा कि नाही? याचा सर्वस्वी अधिकार महापौर यांचा आहे. जो निर्णय घ्यायचा तो ताबडतोब घ्यावा. पाण्याचा विषय घ्यायचा आहे. लेखाविभागा संबंधीत विषय आहे बीले दिली गेली आहे महापालिकेची परिस्थिती नाजूक असतांना बीले दिली गेली. माहिती घ्यावी.

श्री.विजय औताडे :श्री.सय्यद मतीन यांनी वक्तृव्य त्या दिवशी केले होते. सभागृहांचा मान राखला नाही. सभागृहाची शिस्त बिघडण्याचे काम केले. त्यांना सभागृहात प्रवेश देऊ नये.

श्री.नासेर सिद्दीकी :सचिव यांचेकडून खुलासा घ्यावा.

श्री.अफसर खान :महापौरांना निर्णय घेण्याचा अधिकार आहे. आपण निर्णय घ्यावा. त्यांना सभागृहात बोलवावे. जर निर्णय विरोधात द्यायचा असेल तर योग्य असावा. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न कोणी निर्माण केला? सर्व शहरवासीयांनी बघितले कुणी मारहाण केली? सर्वानी बघितले श्री.सय्यद मतीन यांचेवर अन्याय झाला न्याय द्यावा. कार्यवाही करायची असेल तर सर्वांवर करावी.

श्रीमती सरवत बेगम :सभागृह चालविण्याची जबाबदारी महापौर यांची आहे. ज्यांनी गोंधळ घातला मारहाण केली त्यांना सुट देत आहे. ज्यांनी मार खाल्ला त्यांचेवर कार्यवाहीचा बडगा उचलणे योग्य नाही. त्यांना न्याय द्यावा सभागृहात प्रवेश द्यावा.

मा.महापौर :आज पाणीपुरवठ्यावर असलेली बैठक घेत आहोत. श्री.सय्यद मतीन यांना प्रवेश देणे बाबत मागणी केली. परंतु सभेचे कामकाज नियमावली, अधिकार, पीठासीन अधिकारी यांचे अधिकार सर्वांना माहित आहेत. सभागृहात प्रवेश देणे बाबत अधिकार महापौर यांचेकडे राखीव आहे. त्या अधिकाराचा दुरूपयोग होणार नाही. याची काळजी घेत असतो. परंतु, काही प्रसंग असे असतात की, ज्यांचेमूळे घेतलेला हा निर्णय आहे. दिनांक १७ ऑगस्ट रोजीच्या सभेत निर्णय घेतला त्याच सभेत आदेश दिले होते की, वेळोवेळी सभा चालू असतांना सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन निर्णय घेण्यात येईल. त्या बाबत लेखी त्यांना कळविले आहे. सचिव यांचेकडे त्यांचा अर्ज आला होता. सभागृहात येण्यास का नकार दिला? कायदेशीर बाबी तपासल्या जात आहे. कायद्याच्या चौकटीत राहून सचिव यांनी त्यांना उत्तर दिले आहे. कायद्याच्या चौकटीच्या बाहेर जाऊन निर्णय घ्यायचा नाही. पीठासीन अधिकारी म्हणून संपुर्ण अधिकार महापौराचा

आहे. त्यानुसार हा निर्णय घेतला आहे. आजच्या सभेसाठी निर्णय कायम ठेवण्यात येतो. त्यांना सभागृहातील प्रवेश नाकारण्यात येतो.

श्री अफसर खान :ते निवडून आलेले सदस्य आहे. सभागृहात आल्यानंतर पुन्हा गोंधळ करीत असेल तर कार्यवाही करू शकतो. परंतु त्यांना प्रवेश नाकारता येत नाही. हे आपण पदाचा दुरूपयोग करीत आहे.

या वेळी काँग्रेस पक्ष व एमआयएम पक्षाचे सदस्य श्री.सय्यद मतीन यांना सभागृहात प्रवेश देण्याची मागणी करतात. डायस समोर सदस्य खाली बसतात.

मा.महापौर :कायदेशीर बाबी तपासून निर्णय घेऊ आता निर्णय बदलणार नाही. माझे निर्णया विरूध्द अपील करू शकता.

श्री.भगवान घडमोडे :शहरात ६-७ दिवसाआड पाणी येत आहे. दिवाळीचा सण आहे नागरीकांना त्रास होत आहे.

मा.महापौर :जे डायस समोर खाली बसलेले आहेत त्यांची नावे लिहून घ्यावी.

श्री.भगवान घडमोडे :एमआयएमचे नगरसेवक मुद्दामहून खाली बसले आहेत. पाणी विषय घेऊ नये असे त्यांना वाटते.

मा.महापौर :जे सदस्य समोर खाली बसले आहेत. त्यांनी त्यांचेवर कार्यवाही करण्यास मला भाग पाडू नये. सर्वांनी जागेवर बसावे. स.श्री.अजीम अहेमद यांचे सभासदत्व रद्द करण्यात येते. आपण सभागृहा बाहेर जावे.

श्रीमती शोभा बुरांडे :दिवाळीचा सण आहे. पाण्याचा प्रश्न आहे. त्यावर चर्चा व्हावी.

मा.महापौर :स.श्री.नासेर सिद्दीकी, स.अफसर खान व इतर सदस्यांना विनंती की, त्यांनी जागेवर बसावे. सभेच्या कामकाजात भाग घ्यावा. कार्यवाही करण्यास मजबूर करू नये.

या वेळी वारंवार मा.महापौर यांनी सुचना करूनही सदस्य जागेवर बसत नाही.

श्री.राजगौरव वानखेडे, स.श्री.प्रमोद राठोड, स.श्रीमती ज्योती पिंजरकर, स.श्रीमती कमल नरोटे. स.श्री.सचिन खैरे, स.शिल्पाराणी वाडकर, स.श्रीमती सुरेखा सानप यांनी पाणी प्रश्नावर चर्चा करण्याची मागणी करतात.

मा.महापौर :पाच मिनिटाचा वेळ देतो. जागेवर बसणेसाठी नसता. कार्यवाही करावी लागेल. (पाच मिनिटाचा वेळ पुर्ण होतो.) ही महत्वाची सभा आहे. जनतेच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असतांना सदस्य डायस समोर बसतात. हे योग्य नाही. स.सय्यद मतीन यांचे प्रवेशाबाबत सर्व कायदेशीर बाबी नियम तपासून पुढच्या सभेत निर्णय घेऊ.

श्री.राजेंद जंजाळ :अनेक नागरीकांचे प्रश्न आहेत. जो सभेचा विषय आहे. तो सुरू करावा.

मा.महापौर :सर्वांनी कामकाज चालू असतांना शिस्त पाळली पाहिजे. आज ज्या विषयावर गोंधळ झाला. सभा चालू न देणे, स्वत:हून आमच्यावर कार्यवाही करावी. मागणी करणे त्यानुसार स.सदस्य श्री. जमीर कादरी, श्रीमती संगीता वाघुले श्री.इरशाद इब्राहिम खान, श्री.नासेर सिद्दीकी, श्री.खान जहागीर, श्री.अय्युब जागीरदार, श्री.गंगाधर ढगे, श्रीमती तसनीम बेगम, श्रीमती खान सायरा बानो, श्रीमती सरवत बेगम, श्रीमती शेख नरगीस, श्री.अब्दुल नाईकवाडी, श्री.विकास

एडके, श्रीमती लता मगन निकाळजे, श्रीमती सलीमा बाबुभाई कुरैशी, श्री.शेख जफर याचे एक दिवसांसाठी सभासदत्व रद्द करण्यात येते. त्यांना निलंबीत करण्यात येते.

या वेळी निलंबीत स.सदस्य घोषणा देत सभागृहा बाहेर जातात.

**<u>विषय क्रमांक ७३४:-</u>**

पाणीपुरवठा वितरण व्यवस्था सुरळीत करणे, अनधिकृत नळ जोडण्या अधिकृत करणेसाठी अभय योजना राबविणे, पाणी पुरवठ्याचे नियोजन करणे, पाणीपट्टी वसुली करणे, पाणीपुरवठ्याची हाती घेण्यात आलेली देखभाल दुरुस्ती व इतर कामे, व समांतर जलवाहिनी प्रकल्पासंदर्भात आढावा घेणे. पाणीपुरवठ्या संदर्भात नियुक्त केलेल्या तांत्रिक सल्लागार यांनी सुचविलेल्या दुरूस्ती संदर्भाने करावयाची कार्यवाही, जलकुंभावरून जाणाऱ्या मुख्य जलवाहिनीवरील अनधिकृत नळ जोडण्या खंडीत करणे, इ.बाबतीत आढावा घेणे.

श्री.राजेंद्र जंजाळ :अनेक भागात पाणीपुरवठा विस्कळीत झालेला आहे. आवश्यक करावयाची कामे होत नाही. माझ्या वार्डातील टाकी एमजीपी कडून हँडवर्क केलेली नव्हती. हँडवर्क करून ग्रॅव्हेटीने जे पाणी येते. तेच पाणी पाण्याच्या टाकीमध्ये घेऊन पाणी पुरवठा केला. तर नेमके किती पाणी आले व लोकांना किती दिले? हे समजेल. तसेच पैठण येथे एखादा पंप बंद पडला तर ग्रॅव्हेटीने पाणी येत नाही. त्या टाकीत पाणी टाकून नागरीकांना पाणी द्यावे. त्यासाठी वेगळा खर्च लागणार नाही. त्या टाकीतून पाणी चालू करावे.

मा.आयुक्त :पाण्याचे कुठलेही नियोजन करणेपूर्वी नेमक्या काय अडचणी आहे. पाणी किती येते? मॅन पावर किती? तांत्रिक समस्या काय येतात? या शहराचे नाव देशभरात आहे. श्री.होलानी हे तज्ञ व्यक्ती त्यात आहेत. ते सध्या पाणीपुरवठा नियोजन कसे असायला पाहिजे? याबाबत अभ्यास करीत आहेत. भविष्यात पाणी प्रश्न सोडविण्यासाठी काय पावले उचलायला पाहिजे? या बाबत ते सविस्तर माहिती देतील.

मा.महापौर :स.श्री.होलानी साहेबांचे प्रेझेन्टेशन आहे. मा.आयुक्तांनी या बाबत विनंती केली ते प्रेझेन्टेशन झाल्यानंतर आपण चर्चेला सुरूवात करू. सर्वांनी शांततेत ऐकून घ्यावे. त्यानंतर प्रश्न उपस्थित करावे.

यावेळी स श्री.होलानी साहेब यांनी पाणीपुरवठ्या संबंधीच्या समस्ये बाबत व नियोजन करणे बाबत सविस्तर पावर पाईन्ट प्रेझेन्टेशन नुसार सभागृहात माहिती दिली.

मा.महापौर :आताच जे प्रेझेन्टेशन दिले त्या माहितीचे बुकलेट तयार करून सर्व सदस्यांना प्रत दिली जाईल.

श्री.राजेंद्र जंजाळ :मायक्रो प्लॅनींग नुसार काम केलेले नव्हते. आता कामाला सुरूवात झाली. पाणी का येत नाही, यावर कुणी अभ्यास केला नव्हता.परंतु जे प्रेझेन्टेशन दिले त्यानुसार ज्या जायकवाडी ते नक्षत्रवाडीपर्यंत लाईन ४०-४५ वर्षापुर्वी टाकलेल्या आहेत. त्यांची लाईफ संपली. आता श्री.होलानी साहेबांनी सांगितले की, त्याची सीव्हॅल्यू जेवढी पाहिजे तेवढी नाही. ३० टक्के पाणी गळती आहे. यापुढच्या काळात उन्हाळा चालू होणार आहे. पाण्याची लेव्हल खाली जाणार आहे.

आणीबाणीची परिस्थिती निर्माण होणार जे काम करायचे ते उन्हाळापुर्वी करावे. २७८ एमएलडी पाणी शहराला पाहिजे. १२५ येते त्यात गळती पकडली तर कमी येते. विद्युत पुरवठा खंडीत झाल्यानंतर जे ग्रॅव्हेटीने पाणी शहरात येते. टाक्या भरतो. जर वितरण व्यवस्था बंद झाल्यामूळे अडचणी निर्माण होतात. आता आपण राईट ट्रॅक नुसार काम सुरू केले आहे. एक्झीटींग व्यवस्थेमध्ये पाणी गळती कमी करून जास्तीत जास्त पाणी कसे आणता येईल त्यासाठी काम करावे. १३ ते १७ टक्के पाणी गळती सांगितले. ते गळती की, चोरी होते तेही तपासण्याची गरज आहे. शहरातील इन्टरनल पाणी व्यवस्थेवरही अभ्यास करावा. पाईप लाईनचा अभ्यास करून हे प्रेझेन्टेशन करण्यात आले आहे. १५ लक्ष लोकसंख्या ही २.६० लक्ष घरात राहते लिगल घरात नळ घेणारेची संख्या १.३५ लक्ष असेल, पाण्याची तुट जायकवाडी ते नक्षत्रवाडी तसेच तेथून शहरापर्यंत असलेली इल्लिगल कनेक्शन्स त्यातून जाणारे पाणी या सर्वांचे नियोजन केले तर शहरात दररोज पाणी देऊ शकतो. उपाययोजना ज्या सुचविल्या त्यावर काम करावे. जेव्हा पाणी बंद करतो व पुन्हा पाणी सोडण्यासाठी चार-चार तास वेळ लागतो. काम पुर्ण होत नाही. तो पर्यंत पाणीपुरवठ्यात सुधारणा होणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :काय त्रुटी आहे व काय केले पाहिजे? यावर श्री.होलानी साहेबांनी अभ्यास केला. तज्ञ म्हणून त्यांनी ज्या टिप्पणी अहवाल दिला त्यावर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. पाणी पुरवठा योजनेवर मोठे प्रेशर आहे. ज्या सुचना दिल्या त्यावर अंमलबजावणी व्हावी. पाणीपुरवठ्याच्या ठिकाणी जी लाईट वापरतो. बिघाड झाला तर एमएसईबीच्या कर्मचारी बोलवावे लागतात. त्यात वेळ जातो. त्यासाठी अशा अडचणी आल्यास त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा मनपाकडे असावी. चार-चार तास गॅप पडणार नाही. शहराच्या मुख्य लाईनचा सर्वे केला. दुसऱ्या टप्प्यात डिस्ट्रीब्युशन लाईनचे सर्वे करतील. कुठे क्रॉस कनेक्शन केले? तर त्या भागाचा पाणीपुरवठा प्रश्न संपतो. एखादा व्हॉल्व्ह टाकला तर एका भागाला आता व दुसऱ्या भागाला एक तासानंतर पाणी देऊ शकतो. डिस्ट्रीब्युशन लाईनचा अभ्यास करावा. समांतर जलवाहिनीचा विषय अनेक वर्षापासून चालू आहे. कोर्ट मॅटर आहे. शासन निर्णय घेणार आहे. आता तातडीने महापालिका म्हणून आपण सर्वांनी मिळून कार्यवाहीसाठी सज्ज झाले पाहिजे. किमान जायकवाडी ते फारोळा पर्यंत पाईप लाईन करणेसाठी परवानगी घ्यावी. तातडीने ते काम करावे.

श्री.त्र्यंबक तुपे :जायकवाडीपासून येणारे पाणी, होणारी गळती व चोरी यामध्ये मोठी तफावत दिसून येते. होणारी गळती आणि येणारे पाणी अपेक्षीत पाणीपुरवठा किती लागणार? यावर श्री.होलानी साहेबांनी अभ्यास केला. अनेक कर्मचारी निवृत्त होणार आहे. पर्यायी कर्मचारी व्यवस्था काय आहे? असा ही प्रश्न आहे. सन १९७२-७३ ची ही योजना आहे. जवळपास १३ व १७ टक्के गळती आहे. हे मनपाचे अधिकारी यांचे लक्षात का आले नाही? गळतीवर होणारा खर्च मोठा

आहे. त्या खर्चात कोणती कामे केली? तणावग्रस्त कर्मचारी काम करतात काय? याच सभेने अनेक उपाय दिले होते. विज पुरवठा खंडीत होणे तेथे जोडणी व्हावी. नवीन फिडर बसवावे असे म्हटले होते. ते काम का केले नाही? पाणी गळती व कमी येणे किती टक्के पाणी कमी येते? गळती झाल्यानंतर किती पाणी शहरात येते? गळती किती होते? त्यावरही अभ्यास करावा. शहरातील पाणी वाटपचा, होणारे पाणी गळतीवर अभ्यास व्हावा. घराच्या संख्येची गणना केली तर येणारे पाणी कमी आहे. नवीन वसाहती वाढत जात आहे. मुख्य जलवाहिनी टाकली जाते. त्यातून पाणी दिले जाते. तेथेच अनेक कनेक्शन दिले जाते. जोपर्यत इन्टरनल जलवाहिनीचे पाणीपुरवठा संपत नाही. तोपर्यंत मुख्य लाईनला ४-५ तास पाणी चालूच असते. त्यासाठी पॅररल लाईन असावी. एकाला पाच तास दुसरीकडे ४०-५० मिनिटे पाणी दिले जाते. काही ठिकाणी पाणी वायाही जाते. टप्प्याने पाणी देणेसाठी लाईनची व्यवस्था करावी लागेल. कनेक्शन दिले घरांची संख्या किती आहे? कमर्शियल कनेक्शन किती? याचा ताळमेळ लागत नाही. सर्वे करावा. काही ठिकाणी अर्धा इंच कनेक्शन परंतु १ इंचचे कनेक्शन आहे. शिवाय २४ तास पाणी चालू आहे. येणारे पाणी त्याचे वितरण व्यवस्थीत करावे. मनपाच्या हक्काचे पाणी मिळावे यासाठी एक ठराव करून शासनाकडे पाठवावा. समांतर बाबत ठराव केला त्याचे काय झाले? गळती काढली पाहिजे. कंपनी बरोबर काय बोलणे झाले. जायकवाडी ते नक्षत्रवाडी लाईनचा ठराव केला. त्यानुसार काम करावे या लाईनसाठी निधी आहे कंपनीने काम केले नाही तर उशीर होईल. त्याचे वेगळे टेंडर करणे आवश्यक असेल तर ते करावे. काम सुरू करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :दररोज २७८ एमएलडी पाणी लागणार आहे. येणारे पाणी १२५ एमएलडी येते. तर एक दिवसाआड पाणी दिले पाहिजे. मागिल एका वर्षी दुष्काळ परीस्थिती असतांना समांतर एजन्सीने नक्षत्रवाडी येथील एमबीआर मध्ये पाणी न घेता डायरेक्ट एक्सप्रेस लाईनवर पाणी दिले होते. तरी पाणी पुरवठा सुरळीत होता. ४८-५० एमएलडी पाणी एन-५ च्या टाकीवर तेव्हा येत होते. आता तेथे ३८ ते ४० एमएलडीच पाणी येते. ती उपाययोजना का करीत नाही? एक्सप्रेस लाईनवर किती वार्डाना पाणी जाते? लोकसंख्या किती आहे? किती इनलिगल नळ आहे? अधिकृत किती? पाण्याच्या टाकीला मीटर लावले जावे. एमबीआर मध्ये पाणी घेतल्याने एक्सप्रेस लाईनवरून पाणी कमी येते व त्यावर जास्त वार्डात पाणीपुरवठा होतो. त्यासाठी डायरेक्ट दोन्ही लाईनला कनेक्शन करावे.

श्री.प्रमोद राठोड :१२५ एमएलडी पाणी येते असे सांगता कितीही प्रॉब्लेम आले तरी १०० एमएलडी पाणी येत असेल. त्यातून ३ दिवसाआड शहराला पाणी मिळायला पाहिजे. नळाला पाणी आले पाहिजे तसे नियोजन करावे. ७८ टाक्या आहे काहींना डायरेक्ट पाणी देतो पाण्याच्या टाकीवर इनलेट व आऊलेटवर मीटर लावले पाहिजे किती पाणी आले कळेल. डायरेक्ट किती पाणी दिले गेले हे लक्षात येईल. श्री.होलानी साहेबानी चांगली माहिती दिली. मीटर लावून

कॅलक्युलेशन केले तर आहे त्याच पाण्यात सर्वांना पाणी देऊ शकतो. समांतर विषयी निर्णय घेतला. त्या बाबतीत काय कार्यवाही चालू आहे. जायकवाडी ते नक्षत्रवाडी लाईन तातडीने करावे.

श्रीमती किर्ती शिंदे :तीन दिवसाआड पाणी येऊनही पाण्याला प्रेशर नसते व एकाच लाईनवरून इतर ठिकाणी पाणी दिले जाते. कमी दाबाने पाणी आले तर पुर्ण पाणी मिळत नाही. एक दिवस जुन्या शहराला एक दिवस सिडको-हडको व तिसऱ्या दिवशी इतर वसाहतींना पाणी द्यावे. जलतज्ञ समिती स्थापन केली. त्याचे काय नियोजन आहे? त्यांना ही या नियोजना बाबत विचारणा करण्यात यावी.

श्री.सचिन खैरे :मुख्य लाईनवर १०० टक्के प्रेशर असतांना सुध्दा टाकीत पाणी पडत नाही. पहाडसिंगपूरा विदयुत कॉलनी भागात १५ दिवसांपासून पाणी नाही.

श्री.राजू शिंदे :१३४ एमएलडी पाणी येत असेल तर एक दिवसा पाणी का देऊ शकत नाही तसेच जायकवाडी ते जलशुध्दीकरण केंद्रापर्यत १७ टक्के गळती आहे का? शहरातील लाईन मध्ये प्रॉब्लेम आहे ते सुधारावेत.

तज्ञ सल्लागार (श्री.होलानी):हे कॅलक्यूलेशन २ अधिक २ असे नाही. यात पाण्याची क्वॉन्टेटी व प्रेशर अशा दोन्ही बाबी इन्व्हॉल्व्ह होतात. तशा प्रकारे पाणी देता येईल की नाही? ते आताच सांगू शकत नाही. यापूढील डिस्ट्रीब्युशनची त्यामध्ये हा उलगडा चांगल्या प्रकारे होईल. २७८ एमएलडी लागते व १३४ एमएलडी येते तर एक दिवसाआड पाणी द्यावे असे होणार नाही.

श्री.राजू शिंदे :बायपास पाणी दिले तर टाकी भरली जात नाही. ते बंद केले तर टाक्या भरू शकतो का? १३४ एमएलडी पाणी येत असेल तर एक दिवसाआड पाणी का देऊ शकत नाही? कुठे बुस्टर लावायचे? कुठे बायपास करायचे? हा नियोजनाचा भाग आहे ते प्रशासनाने करावे. जायकवाडीतून पाणी येते परंतु जलशुध्दी केंद्रात प्रेशरसाठी वरती पाणी टाकले जाते. त्यामुळे शहरात येणारे पाणी कमी येते.

तज्ञ सल्लागार श्री.होलानी:जे आपण बोलता ते वरवर जरी बरोबर दिसत असेल तरी शास्त्रशुध्द कॅल्क्युलेशन केल्याशिवाय याचा रिप्लाय हो की नाही हे आता देणे शक्य नाही. नॉरमली ते कुठे? १ की २ दिवसाआड सेट होईल असे नाही.

श्री.राजू शिंदे :काम केव्हा करणार आहे? १३४ एमएलडी पाणी येते. परंतु गळती मोठी आहे. जर गळती बंद करून १५० एमएलडी पाणी येणार असेल व ५-६ दिवसा आडच पाणी येणार असेल तर काम करून उपयोग नाही.

मा.महापौर :१३४ एमएलडी पाणीमध्ये जी गळती होते त्यामूळे हे परिणाम होतात काय?

श्री.त्र्यंबक तुपे :१३५ एमएलडी पाणी येत असतांना ३ दिवसाआड पाणी का दिले जाते? कमी खर्चामध्ये काही काम करून एक दिवसाआड पाणी देऊ शकतो का ते पहावे एवढ्या पाण्यात नियोजन करून एक दिवसाआड पाणी देता येते का? यावरही अभ्यास करावा.

श्री.राजू शिंदे :पाण्याची गळती किती? चोरी किती होते? टाकीवरून किती खाजगी टँकर भरून जातात, कमर्शियल नळ किती असायला पाहिजे? सन २०१०-११ मध्ये

७३० कनेक्शन होते. आता शहराची लोकसंख्या २५ लक्ष जवळ आहे. २० टक्के कमर्शियल नळ गृहीत धरले तर १ लक्ष नळ कनेक्शन असेल त्याचे रेट जास्त आहे. जे आता लॉस मध्ये जातो. ते भरून काढू शकतो. कमर्शियल १००-५०० नळ रेकॉर्डवर आहे. डिस्ट्रीब्युशन लाईनच्या ज्या अडचणी आहे ते काम करणेसाठी अधिकारी यांचेमध्ये समन्वय नाही. त्यामूळे पाणीपुरवठ्यावर परीणाम होतो. मराठवाड्याच्या पाणी प्रश्नाला विरोध करणारे श्री.विखे पाटील यांचा मी जाहीर निषेध करतो. तसा ठराव त्यांना पाठवावा. सातारा देवळाईचा समांतर मध्ये समावेश करावा. पाईपचा आकार वाढविला पाहिजे. तशी कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

श्रीमती माधुरी देशमुख :प्रत्येक वार्डात किती पाणी दिले जाते? त्याची नोंद व्हावी. वॉशींग सेन्टरला २४ तास पाणी असते इतर ठिकाणी पाणी नाही. याचे नियोजन असावे. पाणीपुरवठा देखभाल दुरूस्तीची २४ तास यंत्रणा कार्यान्वित असावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:दिवाळीचा सण आहे. तुर्तास काय नियोजन करणार आहे? काही घरांना पाण्याचे प्रेशर नसते. काहींना पाणीच येत नाही तर पुन्हा त्यांना पाचव्या दिवशी पाणी येत असते. असे असतांना पुर्ण वर्षाची पाणीपट्टी कशी घेता? असा प्रश्न नागरीकांचा आहे? कोणत्या भागात किती वेळ पाणी येते? सर्वे करावा

मा.महापौर :सभा एक तासासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ २-२० वा. पुन्हा सभा ३-३० वा.सुरूवात.)

श्री.राजू शिंदे :ज्या वार्डात दलित वस्तीचा निधी आला त्याच वार्डात पुन्हा निधी येणार असेल तर ज्या भागात दलित वस्ती आहे. ज्या राखीव वार्डातून सदस्य निवडून आले तर अशा वार्डातील दलित वस्ती निधीतून कामे होणार की नाही?

श्रीमती सिमा चक्रनारायण:माझे वार्डातही दलित वस्ती सुधार योजनेचा निधी दिला जात नाही. ठराविक वार्डातच निधी का येता?

श्रीमती सुरेखा सानप :वार्डात ७० टक्के दलित वस्ती आहे निधी दिला जात नाही.

श्रीमती मनीषा लोखंडे :वार्डात दलित वस्ती आहे कोणताही निधी दिला जात नाही. मनपाच्या फंडातून काम करावे. पडेगाव येथे कचरा टाकण्यास स्थगिती आलेली आहे. मशीनरी बसविल्या शिवाय कचरा टाकू नये. जेथे कचरा टाकला जातो तेथे बाजूलाच दलित वस्ती आहे. तेथे मुलभूत सुविधा मिळाव्यात. आता पडेगाव येथे कचरा टाकू नये.

श्री.राजू शिंदे :जे राखीव वार्डातून सदस्य निवडून आले. तेथे दलित वस्ती निधी मिळावा. त्या वार्डात कामे व्हावीत. तो निधी दुसरीकडे वळविले जात आहे.

मा.महापौर :जे जे ठराव दलित वस्ती सुधार योजनेचे झाले ते सर्व एकत्रित करून मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावे. तो निधी वाटप करण्याचा अधिकार मा.पालकमंत्री महोदय यांना अधिकार आहे.

श्री.राजू शिंदे :जे राखीव वार्ड जेथे दलित वस्ती आहे. त्या वार्डात निधी मिळाला पाहिजे समान वाटप व्हावे. ज्या वार्डासाठी यापूर्वी निधी आला किंवा त्या वार्डात कामे

झालेली आहे ते सोडून आता इतर दलित वस्ती असलेल्या वार्डासाठी निधी देण्याची मा.पालकमंत्री यांना विनंती करावी.

श्री.राहूल सोनवणे :आमचा भाग स्लम आहे. तेथे दलित वसाहती आहे तेथेही दलित वस्ती निधी देण्यात यावा.

श्री.चेतन कांबळे :पडेगाव येथे कचरा टाकण्यास राज्याचे मा.समाज कल्याण मंत्री यांनी स्थगिती दिली आहे. तरी तेथे कचरा टाकण्यास प्रतिबंध करावे.

श्रीमती मनीषा लोंखडे :संचिका परत पाठवितात विकास कामे कशी करणार आहे?

श्री.प्रमोद राठोड :पाणीपुरवठा, नळ अभय योजना राबविली जात आहे. त्यात ज्यांनी मालमत्ता कर लावला नाही त्यांना नळ लिगल करून देणार नाही असे दिले. गुंठेवारी भागात अनेक संचिका प्रलंबीत आहे. लिगल मान्यता दिली नाही. नळ लिगल करण्यास लोक तयार आहेत. लिगल करून घेत नाही. जे की, कर भरलेला नाही. मग दोन्ही लिगल होऊ द्यायचे का? योग्य निर्णय घ्यावा.

श्रीमती सलीमा बेगम :वार्डात कमी दाबाने पाणी येत असतांना बिल्डरांच्या योजनेला कनेक्शन दिले जात आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :रू.५५००/- अभय योजनेत घेत होतो. आता रू.१४००/- घेतो. जनजागृती करावी. कॅम्प लावावे.

मा.महापौर :दिनांक १२ ते १९ तारखेपर्यत विशेष सप्ताह घेतो आहे. सर्व नियोजन बध्द काम करतो आहे. महापालिकेच्या इमारतीमध्ये काही मालमत्तेचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. सर्व कायदेशीर बाबी तपासून सुरक्षा अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

श्री.भगवान घडमोडे :अभय योजना राबविताना मालमता कराचा विषय शिथील केला. तर नळ लिगल होतील.

मा.महापौर :पडेगाव येथील कचरा न टाकण्या बाबत मा.मंत्री महोदय यांनी निर्णय दिला आहे. मा.आयुक्त तपासून योग्य निर्णय घेतील.

श्रीमती मनीषा मुंढे :सकाळी १० वा.चे पाणी अडीच वाजता आले. रात्री १० वाजेपर्यत होते. गल्ली नंबर ९ मध्ये पाणी वाया जाते. आठ नंबर गल्लीमध्ये पाणी येत नाही. नियोजन करावे.

श्रीमती मुल्ला सलीमा बेगम:वार्डात कमी दाबाने पाणी येते असे असतांना बिल्डराच्या स्कीमला नवीन कनेक्शन का दिले जात आहे? बजाज हॉस्पीटल समोर नवीन वस्ती झाली. तेथे नवीन नळ कनेक्शन दिले.

कार्य.अभि.श्री कोल्हे :स.सदस्या श्रीमती मुंढे ताई यांचे वार्डात लाईन टाकली. पाणी लाईनच्या बाजूने लोकांनी दुरवरून कनेक्शन आणले. त्यांचे म्हणणे, त्या पाणी लाईन चालू करावे. ते नळ अनधिकृत आहे. त्या लोकांना टॅक्स लागलेला नाही. त्यामूळे ती लाईन चालू करू शकलो नाही.

श्री.दिलीप थोरात :अभय योजना राबवित आहोत. ज्यांना कर लागला नाही, त्या नळ कनेक्शन द्यायचे नाही. असे ठरले परंतु अनेक लोकांनी अनधिकृत नळ घेतले आहे. पैसे

न भरता त्यांना पाणी चालू आहे. म्हणजे पाणी देतो ते कर ही भरत नाही. तेथे सुविधाही देतो.

मा.महापौर :त्यामूळेच विशेष मोहिम दिनांक १२ ते १९ पर्यंत घेत आहोत. त्यात नळ लिगल करणे कर लावणे घर लिगल करणे असे विषय असेल. एकाच वेळी सर्व लिगल करण्याची मोहिम आहे.

कार्य.अभि.श्री.कोल्हे :सद्यस्थितीत श्रीमती मुंढे ताई यांचे वार्डात त्या ठिकाणी वाढीव पाणी देता येणार नाही.

श्री.दिलीप थोरात :वाढीव पाणी देण्याचा विषय नाही. जे पाणी सध्या देतो त्यातच समान वाटप करावे.

श्री.भगवान घडमोडे :वाढीव पाणी देण्याचा विषयच येत नाही. ऑलरेडी तेथे कनेक्शन दिलेले आहे.

मा.महापौर :आहे त्याच पाण्यात योग्य ते समान पाणी वाटप करावे.

श्रीमती ज्योती नाडे :काही घरांना पाणी येत नाही तर काहीना कमी दाबाने पाणी येते. ह्या अडचणी तीन चार वर्षापासून आहेत. तेथील काम करणार होते केले नाही.

उपअभियंता श्री.फालक :प्रत्यक्ष तेथे पाहणी करतो.

श्री.भगवान घडमोडे :उपाययोजना काय करायची? अनेकदा चर्चा झाली. ७-८ दिवस पाणी येत नाही. नियोजन का होत नाही?

उपअभियंता-श्री.फालक :श्री.होलानी साहेबांचा सल्ला घेऊन नियोजनाचे काम करीत आहोत. काम चालू आहे.

मा.महापौर :तीन दिवसाआड पाणी देणार होतो. १३५ एमएलडी पाणी दररोज येत असेल तर पाणी जाते कुठे? कन्टेमनेशनचेही कामे होत नाही. पाणी पुरवठ्याचीही कामे होत नाही. तर नियोजन काय आहे?

श्री.राजगौरव वानखेडे :देखभाल दुरूस्तीची कामे का होत नाही? एजन्सीला पेमेंन्ट दिल्यानंतर काम करण्यास तयार नाही.

श्रीमती सिमा चक्रनारायण:काबरानगर वार्डात ८ महिन्यापासून घाण पाणी येते.

श्री.गोकुळसिंग मलके :नारेगाव ब्रीजवाडी भागास पाणी देणेसाठी क्रॉस कनेक्शनचे काम होत नाही. पाईप पडलेले आहेत.

मा.महापौर :श्रीमती मुंढे ताई. श्रीमती सानप. श्रीमती चक्रनारायण. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम. श्री.मलके यांचे वार्डातील पाणीपुरवठा व दुरूस्तीची कामे तातडीने करावी.

कार्य.अभियंता श्री.कोल्हे :श्रीमती सिमा चक्रनारायण यांचे वार्डातील घाण पाण्याचा प्रश्न नव्हता. त्यांनी पाईप लाईन टाकण्याचा विषय होता. वार्डात काम सुरू केले आहे. घाण पाण्यावा विषय आहे. पाहणी केली जाईल.

श्री.प्रमोद राठोड :पाच कोटीची बिले कोणती काढली? रु.२-२ लक्षची मेन्टन्सची कामे होत नाही. जे बील दिले आयुक्तांनी परवानगी होती का?

श्री.राजगौरव वानखेडे :कोणत्या कामाची देयके अदा केली माहिती द्यावी. ठेकेदार सांगतात की, पेमेंन्ट मिळाले नाही. ज्येष्ठतेनुसार बील काढले का? किती बील काढले? कोणाची बिले दिली? सर्व माहिती द्यावी. जे बील काढले कुणाच्या आदेशानुसार दिली.

श्रीमती सुरेखा सानप :वारंवार रिकॉल झालेले टेंडर ठेकेदारास आम्ही भरायला लावले आम्हाला विचारून भरले नाही म्हणून त्यास ब्लॅकलिस्ट केले. काम होऊ दिले नाही.

मुख्य लेखाधिकारी :पाणीपुरवठा देखभाल दुरूस्तीची रु.१,३८,९१,५२५ ची बिले अदा केली व्हाऊचरचे सुध्दा रु.१७.९९ लक्ष दिले. हे सर्व देयक रितसर मंजूर होऊन प्रदानासाठी लेखा विभागात प्रलंबीत होते. ही देयके ज्येष्ठते व प्राधान्य क्रमानुसार दिली आहे. त्याची यादी सुध्दा वेबसाईटवर दिली आहे.

श्री.प्रमोद राठोड :५ टक्के घेऊन बिले काढली. याकडे आयुक्तांचे लक्ष नाही. ज्याचे मागच्या महिन्यात बिल आले त्यांची बिले काढतात व सदस्यांचे नाव सांगतात. रु.१८.५० कोटीची बिले काढली. आयुक्तांनी मंजूरी दिली का? रोडचे कामाचे रु.७.५० कोटीची बिले काढली. किती तारखेला बिल आले? किती तारखेला दिले? शिफारस कुणी केली? यासह द्यावे. आयुक्तांनी सांगून सुध्दा टँकरचे बील काढण्यास वेळ लावतो. जे की, त्यांनी पैसे द्यावे म्हणून हे योग्य नाही. लाईटचे रु.३.५० कोटीची बिले काढली. दिवाळीमध्ये अंधार होता. ज्येष्ठतेनुसार काढले असेल तर तारीख सहित द्यावे.

श्री.राजगौरव वानखेडे :डीपी प्लॅनचे रु.३२ कोटी होते. त्यातून रु.७.५० कोटी कुणाच्या आदेशानुसार दिले? मेन्टनन्सचे पैसे दिले कुणी आदेशीत केले होते? लाईटचे बील दोन महिण्यापूर्वी आले ते बिल दिले गेले. रु.६०,८० लक्षची एक एक बिल दिले आहे. आयुक्त साहेब नव्हते तेव्हा लेखा विभागाचे अधिकारी यांनी मोबाईल बंद करून ठेवले होते. ऑफिस मध्ये मुख्य लेखा अधिकारी बसले नव्हते.

मा.उपमहापौर :रु.१८-५० कोटी बील दिले आयुक्तांची परवानगी घेतली होती का? ज्येष्ठते नुसार बील दिले का? रु.७.५० कोटी डीपी रस्त्याचे पैसे बिले वाटप केले. नंतर बिल आलेले देण्यात आले. कुणाला बिले दिले? केंव्हा बिल आले होते? किती बिल कुणाला दिले? त्याची चौकशी करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :सिनेरिटी नुसार बिल दिले नसेल तर काय कार्यवाही करणार आहे? यापुर्वी सिनेरीटी न ठेवता बिल दिले. श्री.दुर्राणी यांचेवर कार्यवाही केली होती.

श्रीमती मुल्ला सलिमा बेगम: ठेकेदारास बिल दिले नाही म्हणून त्यांनी वार्डातील दुषीत पाण्याचे काम सुरू केले नाही.

श्री.राजू शिंदे :देखभाल दुरूस्तीची बिले सोडून इतर किती बिले दिली? त्याची चौकशी करावी. कुणाच्या सांगण्यावरून दिले? परंतु या शहरातील पाण्याचा प्रश्न सोडवावा. शहरातील सर्व भागात काम व्हावीत. सिनेरीटी डावलून बील दिले जात असेल तर कार्यवाही करावी. रु.६० लक्ष टँकरचे बील दिले. तरी ते बंद आहे. असे का होते. ब्लॅकमेल कुणी करत असेल तर योग्य नाही.

श्रीमती वैशाली जाधव :वार्डात लाईनमन व्यवस्थीत पाणी सोडत नाही. ६-७ व्या दिवशी पाणी येते १० नळाला पाणीच येत नाही. लाईनमनची बदली करावी. ते फोनही उचलत नाही.

मा.महापौर :स.सदस्या श्रीमती जाधव यांचे वार्डातील पाणी पुरवठ्याची कामे तात्काळ करावी. श्रीमती चक्रनारायण यांचे वार्डातील काम करावे. श्री.मलके यांचे वार्डातील काम श्री.पदमे यांनी करावी. पाणी पुरवठ्याची सर्व कामे श्री.रत्नाकर

श्री.कोल्हे यांनी एकत्रित बसून ॲक्शन प्लॅन तयार करावा. सर्व सदस्यांना फोन लावून पाण्याच्या प्रश्ना बाबत माहिती घ्यावी. श्री.सचिन खैरे यांचे वार्डात जेथे पाईप लाईन टाकली तेथे लोकांनी खोदून रबरी पाईप लावून पाणी घेतले. त्यामूळे इतर लोकांना पाणी मिळत नाही. तेथेही पाहणी करावी. जे जे कामे असतील ती सर्व कामे करावी. याची माहिती मला व आयुक्तांना द्यावी.

श्री.सचिन खैरे :हनुमान टेकडी भागात पाणी येत नाही. आज तेथे पाणी सोडणार आहे. तेथे पाणी येईल. सुचना कराव्यात.

मा.महापौर :स.श्रीमती वैशाली जाधव यांचे वार्डातील लाईनमन फोन उचलत नाही. त्यास रू.१०००/- दंड करावा.

श्री.भगवान घडमोडे :बीलाचा विषय येथे घ्यावा. हा आपला कमीपणा आहे. परंतु कामे होत नसेल व ठेकेदार सांगत असेल बील मिळत नाही. तर सदस्यांचे प्रेशर येते. किती बिल सिनेरीटी प्रमाणे दिले? देखभाल दुरूस्ती काम शहरात चालू नाही. अनेक भागात लाईट लावले नाही. काम न करता बील दिले जाते. दसऱ्याच्या वेळेस लाईट लावले नाही. ज्यांचे १५ दिवस महिन्यापूर्वी बील आले त्यांना बिल दिले. रु.१७० कोटीची सीसी येऊन पडली असतांना रु.१८ कोटीची बीले कोणता निकष लावून देण्यात आली? डीपी रोडचे पैसे दिले का? चौकशी करावी. आयुक्तांनी पर्सनल लक्ष घातले पाहिजे. ओपन जीमचे टेंडर करू नये सांगितले होते परंतु त्याचे वर्क ऑर्डर ५ कोटीचे दिली. ते तातडीचे काम होते का? ज्याला ऑर्डर दिली त्यांनी साध्या पेपरवर रेट दिले होते. त्याला काम दिले हे योग्य नाही. अनेक कामे प्रलंबीत आहे. चिकलठाणा येथे कचऱ्याची सेग्रीकेशनचे काम चालू नाही. प्रत्येक ठिकाणी असाच अंधार आहे. सर्व बाबीवर बारकाईने लक्ष घातले पाहिजे. हर्सुल येथे सेग्रीकेशन होत नाही विहिरीत पाणी जाते. सर्व बाबतीत चौकशी करावी.

मा.महापौर :ठेकेदाराची बिले अदा करणे या बाबत वारंवार या विभागावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु काही मर्जीप्रमाणे काम झाल्याचे दिसून येते. संशयास्पद प्रकार रु.१८ कोटीचे बीले देण्याचा समोर येतो आहे. सदस्य जेव्हा विचारणा करतात तेव्हा अधिकारी सदस्यांचा मान ठेवणे त्यांना योग्य उत्तर देणे अपेक्षीत आहे. जमा खर्चाचे नियंत्रण ठेवणे, सभागृहाचे काम आहे. सिनेरीटी प्रमाणे बीले दिली. असे उत्तर देऊन टाकले. योग्य उत्तर दिले नाही तर कार्यवाही करावी लागेल. देखभाल दुरूस्तीच्या कामाची बीले द्यावीत. आमची मागणी होती. आयुक्तांनी सांगितले होते. सदस्यांनी शिफारस केली असेल तर ती बिले १५-२० टक्के दिली असेल असे समजू शकतो. सदस्याचे नाव सांगून बिल दिले असे म्हणणे योग्य नाही. महापौर, आयुक्त यांना विश्वासात घेऊन मुख्यलेखाधिकारी यांनी काम करावे. ठराविक बिले वाटप करायचे, फोन बंद ठेवायचे हे लक्षण बरोबर नाही. असा प्रकार आम्ही सहन करणार नाही. आयुक्तांनी सुट्टीवर जाताना सांगितले होते महापौरांना विश्वासात घेऊन काम करावे. परंतु ते कितपत आदेश पाळले? डीपी रोडचे पैसे कसे वाटप केले.

आयुक्तांना विश्वासात घेतले नाही. अधिकाऱ्यांनी स्वतः मालक होऊ नये. कुणाला बिले दिली? केव्हा दिली केव्हा आली होती कोणत्या हेड मधील दिली? सर्व माहितीसह यावे या सर्व प्रकरणाची चौकशी करावी.

श्री.प्रमोद राठोड :किती तारखेला बिल आले होते? व दिले केव्हा? सर्व माहिती वेबसाईटवर टाकावी.

मा.महापौर :ए.एस.कन्ट्रक्शनला रु.७.१२ लक्ष दिले. त्यांनी कुठे काम केले? कशाचे काम होते? पाहिले गेले नाही बील दिले. पाणीपुरवठा, ड्रेनेज व लाईटची बिले देणेस प्राधान्य द्यावे असे सांगितले होते.ते सोडून डीपी रोडचे पैसे रस्त्याच्या कामासाठी देत असेल तर प्रशासनाला विश्वासात घ्यायला पाहिजे. मा.कोर्टाचे पण निर्देश आहेत. डीपी रोडचे पैसे त्यासाठीच वापरा. या सर्व प्रकरणामध्ये चौकशी करणे आवश्यक वाटते मा.आयुक्त यांचे मार्गदर्शनासाठी श्री.डी.पी कुलकर्णी यांना नियुक्त करणेत येते.

मा.उपमहापौर :चौकशी अहवाल पुढील सभेत यावा चौकशी होईपर्यत मुख्यलेखाधिकारी यांना धनादेशचे अधिकार देऊ नये. देखभाल दुरूस्तीचे काम करणारे रु.१-२ लक्षचे बिले असलेले ठेकेदार आहे त्यांची बिल निघत नाही. चौकशी चालत रहावे यापूर्वीही अनेक चौकशा लावल्या होत्या. हा महत्वाचा विषय आहे. ज्यांचे दोन तीन वर्षापासून ठेकेदाराची बिले दिली नाही. त्यांना बील द्यावे. दिपावलीच्या निमित्ताने त्यांना बीले दिली नाही. काहींना पाच पाच बिले अदा केली. चौकशीची वेळ निश्चित करावी.

मा.महापौर :१५ नोव्हेंबर पर्यंत देयक अदा केल्याच्या प्रकरणाची त्यात ज्येष्ठता यादी असेल ठेकेदाराचे, वार्डाचे नाव असेल त्यासह समोर यावे. रु.१६५ कोटी देयके देणे आहे. त्याची लिस्ट पब्लीश होणे आवश्यक आहे. किती देयके अदा केली? ते ही द्यावे. एकीकडे महावितरणचे स्ट्रीट लाईटचे पैसे भरले नाही म्हणून त्यांनी माझे बहिणीच्या घराजवळील लाईट बंद केले. जी देयके दिली हा प्रकार संशयास्पद आहे. मला ही माहिती नाही. आयुक्तांना माहित नाही हे योग्य नाही. याची चौकशी करून १५ तारखेपर्यत अहवाल द्यावा. त्यानंतरच जी देयके असतील अत्यावश्यक कामे असतील. त्याची द्यायची देयके याबाबत आयुक्त निर्णय घेतील.

श्री.भगवान घडमोडे :शासकीय अनुदान येते ते त्याच कामासाठी वापरले की, इतर कामासाठी रक्कम अदा केली. तीही माहिती द्यावी.

मा.महापौर :खर्च व उत्पन्न या विषयावर ही का.प.क्र.२१ नुसार सभा होती. ती सभा पुढे ढकलण्यात येते. जे जे उत्पन्नाचे स्त्रोत आहे. त्याची यादी स्पायरल बुक तयार करून आजच्या वसुलीची स्थिती आऊट स्टॅडींगची स्थिती, ३१ मार्च पर्यत किती वसुली व्हायला पाहिजे? सर्वच विभागाची माहिती सर्व सदस्यांना देण्याचे अति. आयुक्त, श्री.कवडे याना आदेशीत केले होते. यात दुर्लक्ष झाले. बीओटीच्या कामाची माहिती द्यावी.

श्री.भगवान घडमोडे :टी.व्ही.सेन्टरचे शॉपींग सेंन्टरचे लोकांकडून पैसे घेतले. किती रक्कम जमा आहे? गाळे वाटप का करीत नाही?

मा.महापौर :ही संचिका प्रलंबीत होती? ती का प्रलंबीत होती? त्या संचिकेची चौकशी करावी. ती संचिका मंजूर करून घ्यावी. जे पैसे आले त्यातून काम करायचे आहे. आयुक्तांची त्यावर आजच सही घ्यावी. या सभेची त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

श्री.प्रमोद राठोड :संत तुकाराम नाट्यमंदीर मध्ये महिला बाल कल्याण समितीच्या माध्यमातून जे वस्तु विक्रीचे प्रदर्शन लावले होते. त्यातून मनपास उत्पन्न मिळणार आहे. असे उपक्रम यापूढे घ्यावेत. त्यात प्रशासनाने लक्ष द्यावे. त्याबद्दल सभापती व उपसभापती यांचे अभिनंदन करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :सिडको हडकोसाठी येणारी लाईन डायरेक्ट नक्षत्रवाडी येथे बायपास समांतर एजन्सी असतांना जोडली होती त्याप्रमाणे आताही जोडता येईल का सन २०१२-१३ च्या दुष्काळामध्येही चांगले पाणी आले होते ते पाणी एमबीआर मध्ये पाणी टाकून देतो आहे त्यामूळे कमी पाणी येते.

कार्य.अभियंता :समांतरच्या वेळेस बायपास करून पाणी घेतले होते. जे पंप आहे त्यांचे डिझाईन हे ६५२ च्या लेव्हलला केलेले आहे. बायपास ६२८ ला केलेला होते. त्यामूळे १० मीटरचे हेड कमी झाल्यामुळे पंप चार तास बंद करावे लागत होते. ही वस्तुस्थिती आहे सर्व विचार करून आता ते पाणी एमबीआर मध्ये टाकतो. क्वॉन्टीटी मध्ये काही फरक पडला नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :सन २०१२-१३ मध्ये दुष्काळ असतांना पाणी पुरत होते. मृत साठ्यातून पाणी घेतले तरी पाणी मुबलक मिळत असे.

उपअभियंता :बायपास चालू होते बरोबर आहे. मध्यतंरी तास दोन तास बंद राहत होते. आता सतत पाणी चालू असते. ४८ एमएलडी पाणी येते.

मा.महापौर :महिला व बालकल्याण समितीच्या मार्फत चांगले प्रदर्शन आयोजीत केले गेले होते. लोकांचा त्यास चांगला प्रतिसाद मिळाला. अशा प्रकारे इतर माध्यमातून सुध्दा उत्पन्न वाढले पाहिजे. विशेष वसुली नियमितीकरण सप्ताह राबविण्यात येणार आहे. उत्पन्न वाढविले पाहिजे त्या शिवाय विकास कामे होणार नाही. म्हणून मा.आयुक्त महोदय यांचेशी चर्चा करून यासाठी महापालिका आपल्या दारी म्हणून सप्ताह राबविणार आहोत. यात मा.आयुक्त, महापौर सर्व पदाधिकारी व अधिकारी असतील शिक्षकवर्ग असतील एक मायक्रोप्लॅन करतो आहे. दिनांक १२ ते १९ नोव्हेंबर या दरम्यान सुक्ष्म नियोजन करून राबविणार आहे दर दिवशी एक प्रभागासाठी रु.१ कोटीचे टारगेट देऊन प्रत्येक दिवशी रु.९-१० कोटी वसुल करणार आहोत. मी सोबत राहणार आहे. नागरीकांना कर भरणे साठी विनंती करावी लागेल. त्यामध्ये मालमत्ता कर वसुलीचे व नवीन कर आकारणीचे नोडल अधिकारी श्री.वसंत निकम व श्री.पाटणी आहेत. अनधिकृत नळ नियमितीकरण करणेसाठी श्री.कोल्हे असतील अनधिकृत बांधकाम नियमित करणे कार्यवाही करावी. मा.आयुक्त यांना मा.मुख्यमंत्री

महोदय यांनी प्रत्यक्ष सुचना केल्या होत्या की, इल्लिगल घरे लिगल करायचे असेल तर प्रशमित शुल्क ठरविण्याचा अधिकार आयुक्तांना आहे व सर्वसाधारण सभेच्या निर्णयाची अंमलबजावणी श्री.एस.एस.कुलकणी व श्री.देशमुख यांनी करावी. आता राज्य शासनाकडे हे प्रकरण पाठवू नये. जे काही होईल त्याची जबाबदारी महापौर म्हणून माझी राहिल. दिनांक १२ ते १९ नोव्हेंबर दरम्यान सर्व विभागाच्या वसुली असेल नियमितीकरणाची कार्यवाही असेल. मोहिम राबवायची आहे. श्रीमती खरपे यांनी वसुलीकडे लक्ष द्यावे. प्राणी संग्रहालय व आरोग्य विभाग यांनाही जबाबदारी देण्यात येते. यामध्ये झोन १ करीता श्री.संजय पवार, झोन क्र.२ करीता श्री.अफसर सिद्दीकी, झोन क्र.३ करीता श्री.एम.बी.काझी झोन क्र.४ करीता श्री.सुरेश केंद्रे, झोन क्र.५ करीता श्री.विजय पाटील, झोन क्र.६ करीता श्री.रविंद्र निकम, झोन क्र.७ करीता श्री.संतोष कवडे, झोन क्र.८ करीता श्रीमती मंजुषा मुथा आणि झोन क्र.९ करीता श्री.डी.पी.कुलकर्णी काम करतील. यामध्ये एक नियंत्रण समिती असेल, त्यामध्ये श्री.भालसिंग श्रीकृष्ण, श्री.वसंत निकम, श्री.हेमंत कोल्हे, श्री.ए.बी.देशमुख, विधी सल्लागार, श्री.पाटणी यांचे नियोजन करण्या करीता समन्वय असणार आहे. मायक्रोप्लॅनींग करायचे आहे, मी स्वत: सोबत राहणार आहे. सर्व कार्यालय चालू राहिल. शक्यतो त्या मोहिम काळात कुणाला रजा द्यायची नाही. दिनांक १०-११ पर्यत नियोजन करावे. दिनांक १२ ला मोहिम सुरू होईल. या कामासाठी आम्ही पदाधिकारी मा.आयुक्त वेळेनुसार त्या त्या झोनला भेटी देऊ. तसेच दिवाळीचा सण आहे. बोनसच्या बाबतीत बैठक झाली. यात स.पदाधिकारी गट नेते होते. कामगार शक्ती संघटनेचे पदाधिकारी होते. मा.आयुक्त व इतर अधिकारी होते. चर्चा करून या वर्षीचा बोनस डिक्लेर करतो आहे. सर्वांना विश्वासात घेऊन बोनस देणे विषय आहे. दिवाळीचा सण साजरा करतो. कर्मचारी यांचेकडून वर्षभर काम घेतो सण साजरा व्हावा म्हणून बोनस जाहीर करतो प्रशासनाची यास मान्यता आहे. दिवाळी सणासाठी अग्रीम रू.१२५००/- आहे. ८५० कर्मचारी आहे सहानुग्रअनुदान बोनस रू.२४१९/- देत होतो. आता २६१४ कर्मचारी पात्र आहे त्यांना रू.३५००/- बोनस जाहीर करतो. दैनिक वेतन वर्ग-३,४ चे कर्मचारी बालवाडी शिक्षीका सातारा देवळाई येथील कर्मचारी यांना प्रति रू.२०००/- देण्यात येईल. लिंकवर्कर, आशा वर्कर, तासिका शिक्षक पात्र कर्मचारी ११६ त्यांना रू.१५००/- तसेच बचत गट कर्मचारी यांना रू.१०००/- ३५२ कर्मचाऱ्यांना बोनस जाहीर करतो. दोन वर्षा पासून कर्मचारी यांचे सार्वजनिक सुट्टीचा मोबदला दोन महिन्याचा मोबदला देण्यात यावा. असे एकूण रू.२,६९ कोटी रूपये द्यावे लागणार आहेत. ते वाटप करण्याची घोषणा करण्यात येते. महापालिकेच्या हक्काचे पाण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. मंजूर आरक्षीत पाणी व्यतिरिक्त ८७.४७ द.लक्ष घनमिटर वाढीव पाणी आरक्षण करण्याचा प्रस्ताव आहे. संबंधीत विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यास

मान्यता देण्यात येते. एन-५ टाकीवर जास्तीत जास्त पाणी देण्यात यावे. श्री.कोल्हे श्री.रत्नाकर व त्यांची सर्व टिमने पाणीपुरवठयासाठी लक्ष दयावे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार पाणीपुरवठा उपलब्ध करून घेणे व वाटप करण्या संदर्भात योग्य ते नियोजन करणे, तसेच वरीलप्रमाणे मा.महापौर यांनी केलेल्या सुचना व निर्देश तसेच दिलेले आदेशानुसार योग्य ती तातडीने कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

आजची सभा राष्ट्रगीताने संपल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |